Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

## October - 2025

### दिवाळी विशेषांक



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary



## Table of Contents


- Editorial
- Article
- Guest Editor
- Annapurna Donors
- R.I. President Message
- Photo Gallery
- September 100% Attendance
- October Projects


मुद्रक :
क्रिएटीव आर्टस अँड ग्राफीक्स
मित्र नगर, खोरी गल्ली, लातूर
9730887221, 9834827710

# संपादकीय मनोगत



प्रिय रोटेरियन बंधूंनो,

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या ''दिशा'' या मासिक बुलेटिनचा ऑक्टोबर अंक आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येक महिन्यासोबत आपल्या बुलेटिनचा दर्जा, विषयवैविध्य आणि वाचकवर्ग वाढत आहे, ही आनंदाची बाब आहे.या वर्षी दिशा बुलेटिनसाठी एक नवी दिशा ठरली कारण प्रथमच आपण साप्ताहिक अंक प्रकाशित करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. यामुळे आपल्या क्लबच्या विविध उपक्रमांचा, सेवाकार्यांचा आणि सदस्यांच्या कार्याचा नियमित आढावा वेळेवर पोहोचविणे शक्य झाले आहे. हा बदल आपल्या सर्वांच्या सहभागामुळे शक्य झाला आहे.ऑक्टोबर हा महिना Rotary Community Economic Development Month म्हणून साजरा केला जातो. समुदाय विकास आणि स्वावलंबन या रोटरीच्या मूळ मूल्यांना अधोरेखित करणारा हा महिना आपल्याला सेवाभावी कार्यात नवी प्रेरणा देतो. आपल्या प्रत्येक उपक्रमातून समाजातील गरजू घटकांच्या प्रगतीसाठी हातभार लावणे, हीच खरी रोटरीची ओळख आहे.आपल्या सर्वांच्या सहकार्याने दिशा बुलेटिन सातत्याने समृद्ध होत आहे. आपल्या सूचना, लेखन व सहभागामुळेच ही दिशा अधिक अर्थपूर्ण बनत आहे.

आपला,
रो.अमोल बनाळे
संपादक,दिशा बुलेटिन
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन

## Rotary Disha Editorial Committee


Rtn.Amol Banale


Rtn.Chandrakant Gastgar


Rtn.Pramod Kumbhar


Rtn.Rohit Kulkarni

## Birthdays

- Yenesh Shah - 1 Oct
- Dr. Rajaram Davankar - 4 Oct
- Dr Avinash Bhosale- 5 Oct
- Uday Chownde - 10 Oct
- Dr. Abhijeet Muglikar - 16 Oct
- Vishwas Laturkar - 17 Oct
- Balaprasad Agroy - 23 Oct



## Birthdays

- Dr Sudhir Fattepurkar - 25 Oct
- Vishal Ayachit - 25 Oct
- Dr Chandraprabhu Jangme - 28 Oct

## Guest Editor Rtn.Anil Takalkar



प्रिय रोटेरीयन बांधवांनो,

ऑक्टोबर महिना म्हणजे रोटरीच्या कॅलेंडरमधील अत्यंत महत्त्वाचा कालखंड. या महिन्यात रोटरी "Rotary Community Economic Development Month" म्हणून साजरा केला जातो म्हणजेच समुदायाचा सर्वांगीण आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा काळ. समाजातील सर्व घटकांनी स्वतःच्या सामर्थ्याने पुढे जावे, त्यांना संधी, मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळावी, हीच या महिन्याची खरी भावना आहे.आपला रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन या तत्त्वांना अगदी मनोभावे अनुसरतो. शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, युवक विकास अशा विविध उपक्रमांतून आपला क्लब नेहमी समाजाच्या प्रगतीत हातभार लावत असतो. प्रत्येक सदस्याने आपापल्या क्षमतेनुसार सेवा देणे, हीच खरी रोटरी भावना आणि हीच भावना आपल्या क्लबच्या प्रत्येक कार्यामध्ये दिसते.रोटरीचा हा विषय केवळ आर्थिक समृद्धीपुरता मर्यादित नाही; तो माणसाला ''स्वावलंबनाची आणि सन्मानाने जगण्याची ताकद'' देतो. आपण एखाद्याला मदत करताना फक्त त्याच्या गरजा भागवत नाही, तर त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद देतो हेच खरे रोटरीचे वैशिष्ट्य आहे.ऑक्टोबर महिन्यातील हा विशेषांक म्हणजे आपल्या कार्याचा, आपल्या सेवाभावाचा आणि एकतेचा आरसा आहे. या अंकातून आपण केवळ रोटरीच्या प्रकल्पांची माहिती देत नाही, तर समाजात प्रेरणा आणि सकारात्मक विचारांची बीजे रोवतो.अतिथी संपादक म्हणून मला ही जबाबदारी मिळाल्याचा मला अत्यंत अभिमान वाटतो. या अंकाच्या निर्मितीत सहकार्य करणाऱ्या रोटरी दिशा संपादक मंडळाचे, अध्यक्षांचे, तसेच सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार.

चला, या ऑक्टोबर महिन्यात आपण सर्वजण एकत्र येऊन
''सेवा, स्वावलंबन आणि सामाजिक प्रगती'' यांचा दीप उजळूया.

**रो. अनिल टाकळकर**
अतिथी संपादक - दिशा बुलेटीन

## Message from R.I. President



ऑक्टोबर महिना हा रोटरीच्या समुदाय आर्थिक विकास महिन्याचा काळ आहे आपल्या समाजांना समृद्ध, टिकाऊ आणि प्रगतिशील भविष्य घडविण्यास मदत करण्याच्या आपल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकण्याची ही संधी आहे.हा उपक्रम रोटरीच्या मूलभूत मूल्यांपैकी एक असलेल्या नेतृत्वाच्या तत्त्वाशी पूर्णपणे सुसंगत आहे.

नेतृत्व म्हणजे लोकांना स्वतःच्या प्रगतीचा मार्गदर्शक बनविण्याचे सामर्थ्य देणे.आणि हेच रोटरीच्या आर्थिक विकास प्रकल्पांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

दक्षिण भारतातील एका अलीकडील प्रकल्पाचे उदाहरण घ्या रोटरी सदस्यांनी आदिवासी महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देऊन उपजीविकेचा मार्ग आणि समाजातील सन्मान परत मिळविण्यास मदत केली.या प्रदेशात विधवा किंवा सोडून दिलेल्या महिलांना समाजात स्थान नसते, त्यांना अनेकदा त्यांच्या दुःखासाठी दोष दिला जातो आणि उपजीविकेच्या किंवा प्रशिक्षणाच्या संधी अत्यल्प असतात.

या वर्षी रोटरी क्लब ऑफ विंडसर रोजलँड (ओन्टारिओ) यांनी भारतातील डिस्ट्रिक्ट ३२०३ आणि ३२३४ मधील क्लब तसेच भारतीय सेवालया ट्रस्ट या संस्थेच्या सहकार्याने ८० आदिवासी महिलांना शिवणकामाच्या मशीन आणि प्रशिक्षण दिले. त्यांनी साडीचे ब्लाउज, कुर्ते आणि सलवार सूट शिवणे शिकले ज्यामुळे त्यांनी स्वतःसह आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरु केला.प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक महिलेला प्रमाणपत्र देण्यात आले, तसेच शिवणयंत्र पुरवणाऱ्या संस्थेने दीर्घकालीन फ्री मेंटेनन्स देण्याचे आश्वासन दिले.या प्रकल्पाने समाजाने दूर ठेवलेल्या महिलांना उपजीविका आणि सन्मान दोन्ही दिले.

ही कहाणी म्हणजे रोटरीच्या नेतृत्वाचे प्रत्यक्ष उदाहरण आहे जिथे स्थानिक लोक स्वतःच्या गरजांनुसार उपाययोजना आखतात.आपली भूमिका म्हणजे दान देणे किंवा बाहेरून काही लादणे नव्हे, तर स्वावलंबन वाढविणे नेतृत्व, कौशल्य आणि टिकाऊ उद्योगांमध्ये गुंतवणूक करून.

या ऑक्टोबर महिन्यात मी जगभरातील सर्व रोटरी सदस्यांना आवाहन करतो की त्यांनी आपल्या समाजातील आर्थिक नेतृत्वाबाबत विचार करावा.स्थानिक पातळीवर कोण पुढे येत आहे? कोणते सुप्त कौशल्य आहे जे प्रशिक्षण किंवा मार्गदर्शनाने उभारी घेऊ शकते?आपला क्लब स्थानिक व्यवसाय, व्यावसायिक महाविद्यालये किंवा बचत गटांबरोबर भागीदारी करून नवीन संधी निर्माण करु शकतो का? नेतृत्व नेहमीच दृश्यमान असावे असे नाही.कधी कधी ते ऐकण्यात, सहकार्य करण्यात, आणि इतरांच्या आवाजाला बळ देण्यात असते.हीच रोटरीच्या तत्वज्ञानाची मुळ भूमिका आहे आणि हाच आपल्या दीर्घकालीन परिणामाचा पाया आहे.

सूक्ष्म कर्ज गट, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यशाळा किंवा उद्योजकता कार्यक्रम यांच्या माध्यमातून आपण समाजाची क्षमता वाढवतो.जेव्हा लोक स्वतःच्या प्रगतीची जबाबदारी घेतात, तेव्हा बदल टिकाऊ बनतो.

चला, सद्भावनेने नेतृत्व करूया आणि मनापासून साथ देऊया.स्थानिक नेतृत्व वाढवून आपण अशा संधी निर्माण करु शकतो ज्या व्यक्ती, कुटुंब आणि समाजांना सबल करतात.

एकत्र येऊन आपण सर्वांसाठी कार्यरत अर्थव्यवस्था निर्माण करु शकतो आणि समाज विकासाचे प्रकल्प टिकवू शकतो.

**फ्रान्सेस्को अरेझ्झो**
अध्यक्ष, रोटरी इंटरनॅशनल

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- सर्व सभासद, अन्य व अतिथींचे स्वागत शब्द सुमनांनी केले.
- अध्यक्षांनी सर्व सदस्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.
- देशीकेंद्र बहूद्देशीय सेवाभावी संस्थेंच्या सर्व सभासदांचे स्वागत पेन देऊन करण्यात आले.
- मागील मिटींग चा अहवाल सचिव पवन मालपाणी यांनी सादर केला.
- बीओडी मिटींग चा अहवाल सचिव पवन मालपाणी यांनी सादर केला.
- देशीकेंद्र बहूद्देशीय सेवाभावी संस्थेंचे सदस्य रो.चंद्रप्रभु जंगमे यांनी संस्थेची संकल्पना मांडली.
- गरजु लोकांसाठी जुने कपडे संकलन या कार्यक्रमाची माहिती प्रोजेक्ट चेअरमन प्रशांत भाटगावे यांनी दिली १५० गरजुंना वाटप केले असे सांगितले.
- रोटरी रन : या उपक्रमाचे माहिती रो. प्रसाद वारद यांनी दिली व अधिकाधिक सदस्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले.
- अन्नपूर्णा योजना माहिती प्रोजेक्ट चेअरमन रो. शशिकांत मोरलावार यांनी दिली व लाभार्थ्यांना ड्रेस व साडी वाटप तसेच फराळ वाटप करण्यात येणार आहे असे सांगितले. दिलीप सोनी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून काम पाहणार आहेत असे सांगितले.
- क्लब बुलेटिन : चेअरमन अमोल बनाळे यांनी माहिती दिली व साप्ताहिक बुलेटिन चे विमोचन माजी अध्यक्षपद. शशिकांत मोरलावार, मा. अध्यक्ष रो. विष्णुदासजी तोष्णीवाल, मा. अध्यक्ष रो. लितेशजी शाह, अध्यक्ष व सचिव व अतिथी संपादक रो. दिलीप सोनी यांच्या हस्ते झाले
- २०२५-२६ गोवा कॉन्फ्रन्सचे प्रोजेक्ट चेअरमन म्हणून प्रेसीडेंट इलेक्ट रो. रमेश चिल्ले यांची निवड करण्यात आली. त्यांची पेन देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी कॉन्फ्रन्सची सविस्तर माहिती दिली.
- डिस्ट्रीक्ट कॉन्फ्रन्सची सेक्रेटरी शशिकांत मोरलावार यांनी हि माहिती दिलीं.
- फेलोशिप अनाउन्समेंट श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली यांनी केली.
- बुध्द गार्डन येथे हेल्थ चेक अप कॅम्प घेण्यात येणार आहे असे रो. मोतीलाल जी वर्मा यांनी सांगितले
- रोटरी अकाऊंट नियमित करण्याची सुचना मा. अध्यक्ष रो. विष्णुदासजी तोष्णीवाल यांनी केली.

**Guest of The Meeting**



Mr.Nitin Shabade

**Man of The Meeting**



Rtn.Prasad Warad

**1st Come in the Hall**



Rtn.Dilip Soni



## रोटरी कम्युनिटी आणि इकॉनॉमिक डेव्हलपमेंट : समाजाला स्वावलंबनाकडे नेणारा प्रवास

ऑक्टोबर महिना रोटरीच्या Community and Economic Development Month म्हणून साजरा केला जातो. हा महिना केवळ प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नसून, रोटरीच्या मुळ तत्त्वांपैकी ''सेवा म्हणजेच जीवनाचे ध्येय'' या विचाराला पुन्हा एकदा उजाळा देतो. रोटरीचे प्रत्येक कार्य हे व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या उन्नतीसाठीच केंद्रित असते. आणि आर्थिक विकास हा या उन्नतीचा मुख्य पाया आहे.

**समाजविकासाचा खरा अर्थ**

समाजविकास म्हणजे फक्त आर्थिक भरभराट नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी देणे हा त्याचा गाभा आहे. रोटरीचे Community Development प्रकल्प हे ह्याच संकल्पनेवर आधारित आहेत. जेथे शिक्षण, कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक सहभाग एकत्र येतात, तेथे समाजाचा सर्वांगीण विकास घडतो.

**रोटरीचे योगदान**

रोटरी जगभरात सहकार्य आणि स्वावलंबन यांचा सेतू उभारते. हजारो क्लब्स आपल्या परिसरात आर्थिक सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत.

काही ठळक उदाहरणे:

महिलांचे सक्षमीकरण: दक्षिण भारतात अलीकडेच रोटरी सदस्यांनी आदिवासी महिलांना छोट्या उद्योजकतेकडे वळविण्यासाठी प्रशिक्षण व बँकसहाय्य पुरवले. परिणामी, त्या स्वतःच्या हातांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग तयार करत आहेत.

कौशल्यविकास केंद्रे: अनेक रोटरी क्लब्स शिवणकला, संगणक प्रशिक्षण, वेल्डिंग, इलेक्ट्रिकल कामे अशा क्षेत्रात युवकांना प्रशिक्षण देऊन रोजगारक्ष' बनवत आहेत.

सूक्ष्म उद्योगांना प्रोत्साहन: कमी भांडवल असलेल्या उद्योजकांना रोटरीतर्फे मार्गदर्शन, बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि वित्तीय सल्ला देणे यावर भर दिला जातो.

**शाश्वत विकासाची दिशा**

रोटरीचा दृष्टिकोन नेहमीच शाश्वत (sustainable) राहिला आहे. म्हणजेच केवळ तात्पुरती मदत नव्हे, तर दीर्घकालीन बदल घडविणे हे उद्दिष्ट आहे.स्वच्छ पिण्याचे पाणी, शेतीसाठी तांत्रिक मदत, लघुउद्योगांना बाजारपेठ मिळवून देणे, शाळा व आरोग्यसेवा उपलब्ध करणे हे सर्व घटक आर्थिक विकासासोबतच जीवनमान उंचावतात.

**भागीदारी आणि नेतृत्व**

रोटरीचे वैशिष्ट्य म्हणजे भागीदारीतून नेतृत्व निर्माण करणे. एखाद्या प्रकल्पात लाभार्थी हा केवळ ग्राहक नसतो, तर तो त्या प्रकल्पाचा भागीदार असतो.हेच रोटरीचे नेतृत्वाचे तत्व आहे “Empowering people to guide their own progress.” लोकांना स्वतःच्या प्रगतीचा मार्ग दाखविण्याची ताकद देणे, ही खरी सेवा आहे.

**आर्थिक विकासातून शांतता आणि सौहार्द**

जेथे रोजगार, शिक्षण आणि सन्मानित जीवनशैली आहे, तेथे असमानता कमी होते आणि सामाजिक शांतता निर्माण होते. रोटरीचा हा प्रयत्न केवळ आर्थिक नाही, तर मानवी मूल्यांचा विकास घडवणारा आहे. म्हणूनच रोटरीचे आर्थिक विकास प्रकल्प जगभरात “Peace through Economic Empowerment” या संकल्पनेशी जोडलेले आहेत.

**समारोप**

रोटरीचा प्रत्येक सदस्य हा समाजातील बदलाचा वाहक आहे.आपल्या छोट्याशा उपक्रमातून एखादे जीवन उजळते, एखादा परिवार उभा राहतो, आणि एखादा समुदाय प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकतो. Community and Economic Development Month म्हणजे केवळ उपक्रमांचा उत्सव नव्हे तर सेवा, सहकार्य आणि स्वावलंबनाचा उत्सव आहे.

''जेव्हा आपण एखाद्याच्या उपजीविकेचा मार्ग तयार करतो, तेव्हा आपण त्याला केवळ मदत करत नाही आपण त्याला आशेचा दीप देतो

## प्रेरणादायी - डॉ.रामेश्वरम प्रसाद यादव

काही वर्षांपूर्वी, राजस्थानमधील आपल्या चूरी गावाकडे जात असताना, बालरोगतज्ज्ञ, डॉ. रामेश्वरम प्रसाद यादव यांनी पावसात भिजत पायी चालणाऱ्या चार मुलींना पाहिलं. त्यांच्या पत्नी तारावती यांनी त्या मुलींना लिफ्ट देण्याचा सल्ला दिला. मुलींशी संवाद साधताना त्यांना कळलं की त्या दररोज १८ किमी अंतर पार करून कॉलेजला जातात. गावाहून ६-७ किमी अंतरावर असलेल्या सार्वजनिक बसस्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी त्या मुलींना उन्हाळा असो किंवा पावसाळा, प्रत्येक ऋतूत चालत जावं लागतं. सार्वजनिक बसने प्रवास करताना देखील अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, असं त्या मुलींनी सांगितलं.या गोष्टीने डॉ.यादव आणि त्यांच्या पत्नी खूप प्रभावित झाले. अनेक वर्षांपूर्वी आपल्या सहा महिन्यांच्या लहान मुलीला आजारामुळे गमावलेल्या या दाम्पत्याने घरी जाऊन या विषयावर चर्चा केली आणि मुलींसाठी काहीतरी करण्याचा निर्णय घेतला.डॉ. यादव यांनी आपल्या प्रोव्हीडंट फंड मधून १७ लाख रुपये काढले आणि त्यात स्वतःच्या साठवलेल्या निधीतून आणखी २ लाख रुपये जोडून १९ लाख रुपयांची ४०- सीटर टाटा स्टार बस खरेदी केली. त्यांनी ही बस गावातील मुलींसाठी मोफत सेवा म्हणून सुरु केली.जिथे स्वतः डॉ. यादव वर्षानुवर्षे जुनी मारूती ८०० चालवतात, तिथे या बससाठी दरमहा टोल, टॅक्स, डिझेल ड्रायव्हर आणि कंडक्टरचा हजारो रुपयांचा खर्च ते स्वतःच्या खिशातून उचलतात.'निःशुल्क बेटी वाहिनी' या नावाने ओळखली जाणारी ही बस जवळपासच्या गावांमधून मुलींना घेऊन सुरक्षितपणे कॉलेजला पोहोचवते आणि पुन्हा घरी सोडते. डॉ.यादव यांच्या या उपक्रमामुळे गावकरी आता मुलींना कोणतीही चिंता न करता शिक्षणासाठी पाठवू शकत आहेत.शिक्षणाचा मार्ग सुलभ करणाऱ्या या बससेवेने अनेक मुलींच्या आयुष्याला नवा प्रकाश दिला आहे.










## श्री देशीकेंद्र बहुद्देशीय सेवाभावी संस्थाकडून दिवाळी किट वाटप



औसा/प्रतिनिधी :

औसा तालुक्यातील गरजू नागरिकांची दिवाळी व्यवस्थित रित्या व्हावी आणि ज्या नागरिकांना दिवाळी करण्यासाठी मोठ्या आर्थिक अडचणी येणार आहेत,कुटुंब आर्थिक अडचणीत, अंध, अपंग, विधवा, परित्यक्ता असे कौटुंबिक वातावरण असलेल्या नागरिकांची दिवाळी सुखकर होण्यासाठी श्री देशिकेंद्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कडून दिवाळीनिमित्त दिवाळीत आवश्यक लागणाऱ्या सर्व वस्तू संचा सह गावासाठी १०० अन्नधान्य किटचे वितरण करण्यात येणार आहे.यावेळी प्रातीनिधिक स्वरूपात २५ किट रविवार दिनांक १९ ऑक्टोंबर २०२५ रोजी भादा ग्राम पंचायत कार्यालया शेजारी वितरित करण्यात आले.बाकी सर्व किट त्या संबंधीत नागरिकाच्या घरी पोहंच करुन वाटप करण्यात येणार असल्याचे भादेकर भूमिपुत्र रविशंकर आर पाटील यांच्या कडून समजले.यावेळी किट वितरण कार्यक्रमासाठी या सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष-नितीन शाबादे,सचिव-चंद्रप्रभू जंगमे, सदस्य संजय नागुरे, धनंजय ठाकूर,यशोधन आवंढे,सुरेश स्वामी,सौ सविता द्रोडे आदी संस्थेच्या पदाधिकारी सह भादा येथील सामजिक कार्यकर्ते, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लोकमत**



## 'लोकजाणिवेमुळे मराठी अभिजात भाषा'

**लातूर :** अडीच हजार वर्षांपासून मराठी भाषेत लोकसाहित्य, गुणाढ्यांची बृहत्कथा, सातवाहन राजा हाल यांचा गाथासप्तशती हे ग्रंथ मराठी भाषेचे प्राचीन वैभव आहेत. लोकसाहित्य, संत साहित्याने मराठी भाषेला सार्वत्रिक लोकजाणिवेची अभिव्यक्ती प्राप्त करून दिली. यामुळेच मराठीला अभिजात भाषेचा गौरव प्राप्त झाला, असे प्रतिपादन डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्यावतीने 'अभिजात मराठी भाषा' यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रांतपाल सुधीर लातुरे, ज्येष्ठ कवी रमेश चिल्ले, उपप्रांतपाल रवी हेंगणे, क्लबचे अध्यक्ष अमोल दाडगे, सचिव पवन मालपाणी आदींची प्रमुख उपस्थिती होती. सचिन मालू यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जाधव म्हणाले, मराठीतील लोकसाहित्य समृद्ध आहे. हा लोकजाणिवेचा वारसा मराठी संतांनी पुढे विकसित केला. ही भाषा बारा बलुतेदारांनी व्यवहाराची भाषा म्हणून जोपासली. ओवी, भारुडे, कीर्तन, प्रवचन, लोकगीते यातून हस्तांतरित होत राहिल्याने ती टिकली, असे ते म्हणाले.

Hello Latur
Page No. 3 Oct 20, 2025
Powered by: erelego.com



**अभिनंदन**

**डॉ.राजगोपाल तापडीया रोटरी वर्ष २०२६-२७ असिस्टंट गवर्नर पदी निवड झाली**

## Rotary Mid-Town October Projects











**निर्मल पावन भावना.... सभी के सुख की कामना,दिवाळी भेट.**
**रोटेरियन नेहमी वेगवेगळ्या समाजसेवेच्या उपक्रमांमध्ये सहभागी असतोच. पण त्याचे कुटुंबीय जेव्हा त्यांच्या या कार्यास साथ देण्यास पुढे सरसावतात तेव्हा होणारा आनंद हा अवर्णनीय असतो. यावर्षी आपल्या क्लबचे अध्यक्ष अमोल दाडगे आणि सचिव पवन मालपाणी हे स्वतः रोटरी कार्यात झोकून देऊन काम करतच आहेत , परंतु यावर्षी त्यांनी आपल्या सर्व स्पाउसेस ना देखील सहभागी करून घेतले .आम्हा रोटेरियन च्या मनामध्ये यामुळे समाधानाचे जे तरंग निर्माण होत आहेत ते मी व्यक्त करु शकत नाही.या सर्व मदत कार्यात आमचे विष्णूभाऊ यांचा हिरीरीने सहभाग ही बाब तर सोने पे सुहागा...**
Long Live Rotary...

**रो.सुधीर लातुरे**
**प्रांतपाल - ३१३२**

## Annapurna Donors this Month



**रो.हर्ष मकोल**
**डी.जी. - ३१४२**
**अन्नपूर्णा लाभार्थ्यांना सोलापूरी चादरी उपलब्ध करुन दिल्या.**

सर्वांचे मनापासून
धन्यवाद

**रोटरी अन्नपूर्णा योजना देणगीदाते**

१.शशिकांत निलावार ११,०००/
२.शिवकुमार मुळे ५१००/-
३.जयेश पेद्दे ३१००/-
४.राजाराम दावणकर ३१००/-
५.श्रीकांत अप्पा पंचाक्षरी ३१००/-
६.विजय जी बांगड ३१००/-
७.गोविंद चिंतावार ३१००/-

**रोटरी अन्नपूर्णा योजना ड्रेस देणगीदाते**

१) रो. शशीकांत मोरलावार २ ड्रेस
२) रो विरेंद्र फुंडीपल्ले २ ड्रेस
३) रविंद्र २ ड्रेस
४) रो. जयेश पेद्दे २ ड्रेस
५) रो. अमोल दाडगे २ ड्रेस.
६) रो. गणेश सावंत १ ड्रेस
७) रो.डॉ.पुरुषोत्तम दरक २ ड्रेस
८) श्री स्वामी ५ ड्रेस
९) रो. संतोष गांधी २ ड्रेस
१०) रो. किरण दंडे २ ड्रेस
११) रो. दिलीप सोनी २ ड्रेस
१२) श्री संतोष इंगळे ८ ड्रेस

**अन्नपूर्णा योजना फराळ वाटप दाते**

१. सौ. प्रिया हिंगणे
२. सौ. संगिता लातूरे
३. सौ. शितल देवणीकर
४. सौ. छाया मोरलावार
५. सौ. सारीका गांधी
६. सौ. रचना मालपाणी
७. सौ. राखी पोकणा
८. सौ. सुप्रिया दाडगे
९. सौ. सरीता जोशी
१०. सौ. बसंती सावंत
११. सौ. अर्चना मद्रेवार

## 100% Attendence - September Month



1. Shradhhanand Apshetti
2. Amol Banale
3. Ajay Barule
4. Prashant Bhatgave
5. Shivkant Brijwasi
6. Amol Dadge
7. Santosh Gandhi
8. Pramod Kumbhar
9. Rohit Kulkarni
10.Govind Kunchamwar
11. Kalash Mundada
12. Shrikant Panchakshari
13. Anil Patil
14. Vishnudas ji Toshniwal
15. Virendra Pundipalle
16. Shirish Utage
17. Chetan Pandharikar
18. Motilal Varma
19. Rajgopal Tapdiya





